## महाराष्ट्र शासन

क्रमांक : कृबास-०१२०/प्र.क्र.१९/२१-स,
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक: २४ जानेवारी, २०२०

### आदेश

| |
|---|
| महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ आणि नियम १९६७ |

ज्याअर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ मधील कलम १४(३)(अ) मधील तरतूदीनुसार टंचाई, दुष्काळ, पूर आग किंवा इतर कोणतेही नैसर्गिक आपत्ती, पावसाळा यामुळे किंवा राज्य विधानमंडळाचा किंवा संसदेचा किंवा एखाद्या स्थानिक प्राधिकरणाचा कोणताही निवडणूक कार्यक्रम आणि कोणत्याही बाजार समितीचा निवडणूक कार्यक्रम एकाच वेळी आल्यामुळे, किंवा राज्य शासनाच्या मते विशेष असेल अशा इतर कारणांमुळे लोकहितास्तव कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूका पुढे ढकलण्याचे अधिकार शासनास आहेत.

ज्याअर्थी, राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूकीत पात्र शेतकऱ्यांना मतदानाचा अधिकार देण्यासाठी दिनांक १३.०६.२०१७ रोजीपासून केलेली सुधारणा रद्द करुन सुधारणेपूर्वीचीच तरतूद कायम करणेबाबत कायद्यात दुरुस्ती करण्याचा निर्णय घेतला असून, यासंदर्भात अध्यादेश प्रख्यापित करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. ही बाब लक्षात घेता राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूका पुढे ढकलणे क्रमप्राप्त झाले असल्याचे शासनाचे मत झाले आहे.

Scanned with CamScanner

त्याअर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनयमन) अधिनियम १९६३ मधील कलम १४(३)(अ) च्या तरतूदीअन्वये प्राप्त अधिकारांनुसार महाराष्ट्र शासन असे आदेश देत आहे की :-

"ज्या कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या संचालक मंडळाच्या निवडणूका नियत झाल्या आहेत, अशा कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या संचालक मंडळाच्या निवडणूका या आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीसाठी पुढे ढकलण्यात येत आहेत."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(जयंत भोईर)
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१) सचिव, महाराष्ट्र राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, पुणे
२) पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे
३) कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे
४) सर्व जिल्हाधिकारी
५) सर्व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था
६) सर्व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था
७) सर्व कृषि उत्पन्न वाजार समित्या (संवंधीत जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांचेमार्फत)
८) निवडनस्ती (२१-स)

Scanned with CamScanner